महाराष्ट्र शासन वनविभाग
मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे, वनवृत्त ठाणे यांचे कार्यालय
सनप्लाझा कमर्शियल बिल्डींग, ०४ था मजला, हरिओम नगर, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०० ०८१
दुरध्वनी क्र. - 022-25329642/ 25329865 Email: ccftthane@mahaforest.gov.in /ccfthane@gmail.com

महात्वाचे/तात्काळ

जा. क्र. कक्ष - १२/ मा.अ./392/ २०२५-२६

दि. 11/०२/२०२६

**विषय-** माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४(१) ख अन्वये १ ते १७ बाबींची माहे डिसेंबर अखेरपर्यंतची कार्यालयीन माहिती वनविभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ** - १) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४(१) ख (एक) ते (सतरा).
२) महाराष्ट्र वनविभागाच्या संकेतस्थळावर ठाणे वनवृत्ताची प्रसिध्द केलेली माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४(१) ख (एक) ते (सतरा) ची माहे डिसेंबर अखेरपर्यंतची माहिती.
३) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१२/मा.अ./३५९/२०२५-२६, दि. १४/०१/२०२६

विषयांकित प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४(१) ख (एक), ( दोन), (तीन), (चार), (पाच), (सहा), (सात), (आठ), (नऊ), (दहा), (अकरा), (बारा), (तेरा), (चौदा), (पंधरा), (सोळा), (सतरा), अन्वये आपले कार्यालयातील कार्यालयीन कामकाजाची व कार्यालयातील विविध कक्षांशी संबंधीत कार्यालयीन माहिती तसेच इतर माहिती महाराष्ट्र वनविभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये सदर माहिती आपले कार्यालयातील विविध कक्षांशी संबंधित कार्यालयीन कामकाजाची तसेच सदर माहिती महाराष्ट्र वनविभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे करीता आवश्यक असलेबाबत या कार्यालयाच्या सर्व कक्षांना कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने कक्षांकडील प्राप्त माहिती महाराष्ट्र वनविभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाची आहे. तरी कार्यालयीन कक्ष- ११ (तांत्रिक) यांना सदर बाबतीत तयार केलेली सन २०२५-२६ ची माहे डिसेंबर अखेरपर्यंतची माहिती (संलग्न) वनविभागाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबतची कार्यवाही करणेचे आदेश देण्यात येत आहे.

एन. आर. प्रवीण
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे


प्रती,
कार्यालयीन कक्ष-११


प्रत - प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नि.), ठाणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
प्रत - विभागीय वन अधिकारी (दक्षता), ठाणे यांना माहितीसाठी.
प्रत - प्रशासकीय अधिकारी, ठाणे याना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
प्रत - जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल (जंकासस.), ठाणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
प्रत - वनसांख्यिक, ठाणे यांना माहितीसाठी


# मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे वनवृत्त माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ (१) (ख) प्रमाणे प्रदर्शित करावयाची माहिती माहे डिसेंबर २०२५ अखेर


अनुक्रमणिका



| अ.क्र. | विषय | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १ | कार्यालयाची रचना, कार्य व कर्तव्ये | १ ते ११ |
| २ | अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये | १२ ते १४ |
| ३ | निर्णय घेण्याची कार्यपद्धती, पर्यवेक्षण व उत्तरदायित्व प्रणाली | १५ |
| ४ | कामाचे निकष | १६ |
| ५ | कार्य पार पाडण्यासाठी वापरावयाचे नियम व कायदा | १७ |
| ६ | विभागामधील कागदपत्रांच्या वर्गवारीचे विवरणपत्र | १८ |
| ७ | धोरण तयार करण्याच्या किंवा अंमलबजावणी प्रक्रियेमध्ये जनतेच्या सहभागासाठी केलेली उपाययोजना | १९ |
| ८ | सल्ला देण्यासाठी स्थापन केलेली मंडळे/समित्या/परिषद या बाबतची माहिती | २० |
| ९ | अधिकारी व कर्मचाऱ्यांची निर्देशिका | २१ |
| १० | प्रत्येक कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन, नुकसान भरपाईची कार्यपद्धती | २२ ते २४ |
| ११ | सर्व योजनांचा तपशिल, प्रस्तावित खर्च, अर्थसंकल्प संवितरण रक्कम | २५ |
| १२ | सबसिडीचे कार्यक्रम, पद्धत, रकमा, लाभार्थीबाबतची माहिती | २६ |
| १३ | ज्या लाभार्थी व्यक्तींना सवलती दिल्या त्याबाबतची माहिती | २७ |
| १४ | इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध असलेली माहिती | २८ |
| १५ | लायब्ररीसह नागरीकांना माहिती मिळणेसाठी दिलेल्या सुविधा | ३० |
| १६ | माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची माहिती | ३१ ते ३२ |
| १७ | इतर माहिती | ३३ |



A
मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे, वनवृत्त ठाणे
विभागीय वनअधिकारी (नियोजन) ठाणे
कार्यालयीन कर्मचारी
शिपाई
विभागीय वन अधिकारी (दक्षता),ठाणे
कार्यालयीन कर्मचारी
शिपाई
सहाय्यक वनसंरक्षक वन सांख्यिक, ठाणे
कार्यालयीन कर्मचारी
शिपाई
वन परिक्षेत्र अधिकारी (जं.का.स.सं.) ठाणे
कार्यालयीन कर्मचारी
शिपाई
वन सांख्यिक
वरिष्ठ सांख्यिक सहाय्यक
कनिष्ठ सांख्यिक सहाय्यक
प्रशासकीय अधिकारी
मुख्य लेखापाल
लेखापाल
लिपिक
शिपाई
उप वन अभियंता
कार्यालयीन कर्मचारी
शिपाई
उच्चश्रेणी लघूलेखक
कार्यालयीन कर्मचारी
शिपाई
वनक्षेत्र सर्वेक्षक
कार्यालयीन कर्मचारी
शिपाई



B
उप वनसंरक्षक, ठाणे
सहाय्यक वन संरक्षक
कार्यालय अधिक्षक
वनक्षेत्रपाल
मुख्य लेखापाल
वनपाल
लेखापाल
वनरक्षक
लिपीक
वनमजुर
शिपाई / रखवालदार


C
उप वनसंरक्षक, डहाणू
सहाय्यक वन संरक्षक
कार्यालय अधिक्षक
वनक्षेत्रपाल
मुख्य लेखापाल
वनपाल
लेखापाल
वनरक्षक
लिपीक
वनमजुर
शिपाई / रखवालदार


D
उप वनसंरक्षक, शहापूर
सहाय्यक वन संरक्षक
कार्यालय अधिक्षक
वनक्षेत्रपाल
मुख्य लेखापाल
वनपाल
लेखापाल
वनरक्षक
लिपीक
वनमजुर
शिपाई / रखवालदार


E
उप वनसंरक्षक, जव्हार
सहाय्यक वन संरक्षक
कार्यालय अधिक्षक
वनक्षेत्रपाल
मुख्य लेखापाल
वनपाल
लेखापाल
वनरक्षक
लिपीक
वनमजुर
शिपाई / रखवालदार


F
उप वनसंरक्षक, अलिबाग
सहाय्यक वन संरक्षक
कार्यालय अधिक्षक
वनक्षेत्रपाल
मुख्य लेखापाल
वनपाल
लेखापाल
वनरक्षक
लिपीक
वनमजुर
शिपाई / रखवालदार


G
उप वनसंरक्षक, रोहा
सहाय्यक वन संरक्षक
वनक्षेत्रपाल
वनपाल
वनरक्षक
वनमजुर
कार्यालय अधिक्षक
मुख्य लेखापाल
लेखापाल
लिपीक
शिपाई / रखवालदार

ठाणे वनवृत्त एकुण वनक्षेत्र

| अ.क्र. | वन विभाग | एकुण वनक्षेत्र (चौ.कि.मी) |
|---|---|---|
| १ | उप वन विभाग ठाणे | १०७३.६३४४ |
| २ | उप वन विभाग डहाणू | ११४७.७१०५ |
| ३ | उप वन विभाग जव्हार | ८९४.६२६३ |
| ४ | उप वन विभाग शहापूर | ९०३.५९९० |
| ५ | उप वन विभाग अलिबाग | ११६.९९१६ |
| ६ | उप वन विभाग रोहा | ६७०.४७१० |
| | **एकुण** | **५८५४.१३२८** |

| वन विभाग | वन परिक्षेत्र | वन परिमंडळ | नियतक्षेत्र |
|---|---|---|---|
| ठाणे | १० | ४६ | १५५ |
| डहाणू | १२ | ५९ | १६६ |
| जव्हार | ९ | ४५ | १३० |
| शहापूर | ६ | ३० | १३० |
| अलिबाग | ११ | ६० | २१९ |
| रोहा | ६ | ३४ | ११२ |
| **एकुण** | **५४** | **२७५** | **८९०** |

**वन विभागाची रचना:-**

शासन स्तरावर मा. मंत्री (वने) तसेच मा. राज्यमंत्री (वने) यांच्या अधिपत्याखाली मा. प्रधान सचिव (वने) हे वरिष्ठ प्रशासकिय अधिकारी आहेत. शासन स्तरावर वन विषयक विविध धोरणात्मक निर्णय, अर्थसंकल्प इत्यादी बाबी हाताळल्या जातात.

वन खात्याचे प्रमुख प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) असून त्यांचे अधिनस्थ १७ अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक दर्जाचे अधिकारी असून त्यांच्या स्तरावर विभागाच्या सर्व विषयांची विभागणी करण्यात आलेली आहे. राज्यातील पुर्ण वनक्षेत्र ११ प्रादेशिक वृत्तामध्ये विभागले गेले असून वृत्ताचे प्रमुख हे मुख्य वनसंरक्षक दर्जाचे अधिकारी आहेत. वृत्ताचे वन विभागात विभाजन केलेले असून, वन विभाग प्रमुख पदी उप वनसंरक्षक दर्जाचे अधिकारी असतात. राज्यात एकुण ४६ प्रादेशिक वन विभाग आणि ८ स्वतंत्र प्रादेशिक उप वन विभाग आहेत.

वन्यजीव व्यवस्थापन प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचेकडे असून त्यांचेकडे राज्यात ४ वन्यजीव वृत्त आणि १४ वन्यजीव विभाग आणि इतर प्रशासकिय घटक आहेत.

या व्यतिरिक्त विशिष्ट कार्याकरीता उदा. संशोधन, प्रशिक्षण, कार्य आयोजना, मुल्यांकन इत्यादीसाठी स्वतंत्र अकार्यकारी वृत्त व विभागांची स्थापना केलेली असून कार्य आयोजना आणि संसाधन व उपयोग यांचे प्रमुख हे मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन ) हे आहेत.

ठाणे वनवृत्तामध्ये मुख्य वनसंरक्षक (प्रा.) कार्यालयातील निर्देशन विभागाच्या अखत्यारीत ६ प्रादेशिक वन विभाग आहेत. निर्देशन विभागाचा कार्यभार मुख वनसंरक्षक(प्रा.) यांचे नियंत्रणाखाली विभागीय वन अधिकारी (नियोजन), विभागीय वन अधिकारी (दक्षता), प्रशासकिय अधिकारी, सहाय्यक वनसंरक्षक (वन सांख्यिक), वन परिक्षेत्र अधिकारी (जं.का.स.सं) हे पाहतात. प्रादेशिक वन विभागाचे प्रमुख म्हणून उप वनसंरक्षक दर्जाचे अधिकारी कार्यभार सांभाळतात.

उप वनसंरक्षकांना सहाय्यक म्हणून २ ते ३ सहाय्यक वनसंरक्षक असतात. वन विभागाचे विभाजन हे वन परिक्षेत्रामध्ये वन वन परिक्षेत्राचे विभाजन हे वन परिमंडळात करण्यात येते आणि असे प्रत्येक वन परिमंडळ नियतक्षेत्रात विभागलेले आहे. वन परिमंडळाचे प्रमुख वनपाल आणि नियतक्षेत्राचे प्रमुख वनरक्षक हे असतात. वन विभागातील कनिष्ठतम क्षेत्रीय कर्मचारी हा वनरक्षक आहे.

## २. अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये

### १. मुख्य वनसंरक्षक (प्रा.)

१. मुख्य वनसंरक्षक यांचेकडे त्यांचे वन वृत्ताचा प्रशासकीय कार्यभार असतो. तसेच त्यांचेवर त्यांचे अधिपत्याखालील वन क्षेत्राची जबाबदारी असते.

२. कार्य आयोजना तयार करणे, सर्व वनकामांचे नियंत्रण ठेवणे.

३. संपुर्ण वृत्ताचे आस्थापनेवर नियंत्रण ठेवणे.

४. त्यांचे वन वृत्तातील खर्च, अग्रिमे, सर्व कामे व त्यांचे करार, विक्री व पुरवठा आणि त्यांचे कार्यक्षेत्राचे सामान्य वन व्यवस्थापन करणे.

### २. उप वनसंरक्षक (प्रा.)/ विभागीय वन अधिकारी/ सहाय्यक वनसंरक्षक

१. उप वनसंरक्षक यांचेकडे त्यांचे वन विभागाचा प्रशासकीय कार्यभार असतो. विभागीय कार्यालयाचे ते प्रमुख असतात.

२. त्यांचे विभागाकडील वन व्यवस्थापन, प्रशासन व आस्थापना यावर नियंत्रण ठेवणे.

३. मंजुर आराखड्यानुसार वनांचे समुपयोजन, लागवड व संरक्षक आणि वनोपजांची विक्री नियोजन, विभागाला मालाचा पुरवठा करणे, महसुल जमा आणि खर्चावर नियंत्रण ठेवणे, वनगुन्ह्यांमध्ये मध्यस्थी करणे.

### ३.वन परिक्षेत्र अधिकारी (वनक्षेत्रपाल)

१. वन परिक्षेत्र अधिकारी यांचेकडे संपुण वन परिक्षेत्राचा प्रशासकीय कार्यभार असतो.

२. त्यांचे परिक्षेत्रातील वनांचे संरक्षण व विकास यांची जबाबदारी असते.

३. उप वनसंरक्षक व सहाय्यक वनसंरक्षक यांचे मार्गदर्शनाखाली मंजुर आराखड्यानुसार वनांचे समुपयोजन, लागवड व संरक्षण यांची अंमलबजावणी करणे.

### ४.वन परिमंडळ अधिकारी (वनपाल)

१. वनपाल यांचेकडे त्यांचे संपुर्ण वन परिमंडळाचा प्रशासकीय कार्यभार असतो. वनसंरक्षण, वनगुन्हा अन्वेषण, वनोपज वाहतुक परवाना वितरण, वन चराई फी, वनगुन्ह्यांची नुकसान भरपाई, कुपांतील वृक्षांचे चिन्हांकन करणे, अवैध वृक्षतोडीवर नियंत्रण ठेवणे, अवैध शिकारीवर नियंत्रण ठेवणे इ. कामे वनपाल यांना करावी लागतात.

२. त्यांचे परिमंडळातील सर्व कामांना ते जबाबदार असतात. त्यांचे अधिपत्याखालील वनरक्षकांना

त्यांची कर्तव्ये, दैनंदिनी व वनहद्दीबाबत माहिती पुरविणे, नियम व अधिनियम व कर्तवये याबाबत स्पष्टीकरण करणे.

**५. नियतक्षेत्र अधिकारी (वनरक्षक)**

१. वनरक्षक यांचेकडे त्यांचे नियतक्षेत्राचे संरक्षण व गस्त घालणे.

२. वनहद्दीचे दुरूस्ती व परिरक्षण करणे.

३.ग्रामस्थांकडून होणाऱ्या वनांतील अतिक्रमणाबाबत दक्षता बाळगणे.

४. त्यांचे अधिपत्याखालील नियतक्षेत्रात गुरांना चराई करू न देणे.

५. अवैध वृक्षतोड टाळण्यासाठी अधिपत्याखलील नियतक्षेत्रात वारंवार गस्त घालणे.

६. विहीत कालावधीत जाळरेषा, उंचावरून जाळ ठिकाणाची पाहणी करणे व प्रकरणी कार्यवाही करणे.

७. राखीव वनक्षेत्रात अवैध वृक्षतोड, अवैध शिकार व वनतळ्यातील मासेमारी याबाबतचा अहवाल वरिष्ठांस सादर करणे.

८. अवैध वृक्षतोड झालेल्या बुडांवर शिक्का उमटवणे, बुडांवरील माल हस्तगत करून तो विक्री आगारावर वाहतुक करणे.

९. बीयाण्यांच्या हंगामात बी गोळा करणे, रोपवाटीकेत बी पेरून रोपाटीका तयार करणे, रोपवनात रोपांची लागवड करणे, व वरिष्ठांचे आदेशानुसार इतर वानिकी कामे करणे.

१०. त्यांचे ताब्यातील वन विश्रामगृह व त्या सभोवतालचा परिसर निटनेटका व स्वच्छ ठेवणे.

११. वनगुह्यांचे शोध घेऊन प्रथम गुन्हा रिपोर्ट वरिष्ठांकडे सादर करणे, वनगुन्हेगारांचा शोध घेणे व गुन्हेगाराला वन परिमंडळ अधिकाऱ्यांकडे स्वाधीन करणे.

**६. वनक्षेत्र सर्वेक्षक**

१. वनक्षेत्र सर्वेक्षकांचे वनक्षेत्राचे सर्वेक्षण नोंदी यांची देखभाल करणेची जबाबदारी महसुल जिल्हा निरीक्षकांप्रमाणे असते.

२. नकाशांची नोंदवही अद्ययावत ठेवणे.

३.वन विभागाकडील नकाशा नोंदवही, महसुल विभागाकडील नकाशा संच, नमुना नं. १ मधील वन विभागाचे राखीव व खाजगी वनांचे नोंदी महसूल विभागाकडील दप्तरातील नोंदीशी प्रमाणित करणे.

४.प्रादेशिक विभागाकडील ज्यावेळी सिमा व सिमांकन कामाचा कार्यभार घेतला जातो त्यावेळी

लागवड क्षेत्र व कुप यांचे नकाशे तयार करून पडताळणी करणे.

**७.वनसर्वेक्षक**

१. कार्य आयोजनेचे आराखड्यानुसार सिमांकन करणे.

२.उप वनसंरक्षक यांचे निर्देशानुसार इतर सिमांकन करणे.

३. कंपार्टमेंट व कुपांचे आरेखन करणे.

४. वनक्षेत्रांचे गणन व मोजमाप करणे.

५.शासन अधिसुचनेनुसार वनीकरण क्षेत्र व निकृष्ठ वनक्षेत्राचे नकाशांची दुरूस्ती व नोंदी करणे.

६. प्रभावित वनक्षेत्रा संदर्भातील सर्वेक्षण व सिमांकन करणे व त्या संदर्भातील पत्रव्यवहाराची इतिहास पुस्तिका अद्ययावत ठेवणे.

**८. उप वन अभियंता**

१. इमारती ,रस्ते, इतर अभियांत्रिकी कामे यांची संरचना व दुरूस्ती कामे अंदाजपत्रके तयार करणे.

२. तांत्रिक वाहतुक व पुरवठा या संदर्भात मार्गदर्शन करणे.

The Duties of the Dy. Forest Engineer include the preparation of designs and estimates of roads, buildings and other engineering works and the construction of more important of such of works as may be entrusted to him. He is required to make experiments and give his advice regarding the most suitable forms of mechanical transport and mechanical appliances for the extraction of timber and fuel and to assist in their introduction and successful working. The technical supervision of the working of saw mills (mechanical aspect only), the erection of new ones where necessary, and the organization of supply of store are among his duties witch he is expected to perform with the assistance of Saw Mill Engineer, Workshop Superintendent etc.

**९.वन सांख्यिक/ वन सांख्यिक सहाय्यक वरिष्ठ / कनिष्ठ**

१. वन सांख्यिकीच्या स्वरूपातील उपलब्ध असलेली सर्व माहिती अद्ययावत ठेवणे.

२. वनवृताचा वार्षिक प्रशासन अहवाल तयार करणे.

## ३.निर्णय घेण्याची कार्यपद्धती, पर्यवेक्षण व उत्तरदायित्व प्रणाली

वनांचे संरक्षण व विकासात्मक कामासाठी वृत्तस्तरावर मुख्य वनसंरक्षक, विभागीय स्तरावर उप वन संरक्षक व सहाय्यक वनसंरक्षक तसेच क्षेत्रीय स्तरावर वन परिक्षेत्र अधिकारी यांचे अधिपत्याखाली नियमांचे अनुषंगाने निर्णय घेतले जातात. ज्या वनक्षेत्राची कार्या आयोजना मंजुर आहे त्या वनक्षेत्रात मंजुर कार्य आयोजनेप्रमाणे कार्यवाही केली जाते.

## ४. कामाचे निकष

वनविभागाचे मुख्य काम वन संरक्षण हे आहे. त्यानुसार वन विभागाची रचना असुन त्यानुसार नियतक्षेत्रावरती वनरक्षकांची नेमणूक केलेली असते व जंगल संरक्षणाकरीता वनरक्षकांची कर्तव्ये निश्चित केलेली आहेत. सदर नियतक्षेत्राच्या वनरक्षकांवरती नियंत्रण ठेवणे व आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करणेकरीता काही नियतक्षेत्रांचा मिळून परिमंडळ बनविले जाते व ठराविक परिमंडळाचे एक वनपरिक्षेत्र असते ह्या परिक्षेत्रावर वर्ग-२ दर्जाचे वन परिक्षेत्र अधिकारी असतात ते संपुर्ण वन परिक्षेत्रावरती वनसंरक्षणांचे नियंत्रण करतात.

वनसंरक्षणाशिवाय वनामध्ये विकासाची कामे घेतली जातात. त्यामध्ये प्रामुख्याने जंगलाची वाढ करणेकरीता रोपवन तयार करणे, चर खोदणे, वनतळी बांधणे इतयादी कामांचा समावेश होतो त्या कामावरती वनरक्षक, वनपाल व वन परिक्षेत्र अधिकारी यांचेमार्फत नियंत्रण ठेवले जाते.

वनसंरक्षण करतांना किती गुन्हे पकडले, त्यामध्ये किती प्रकरणे निकाली काढली त्याबाबतची अवैध वृक्षतोड, अतिक्रमण, अवैध वाहतुक, वन्यजीव, वन वणवा व इतर गुन्हेकामांची माहिती दर्शविणारा माहे डिसेंबर २०२४ पर्यंतचा अहवाल www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## ५. कार्य पार पाडण्यासाठी वापरावयाचे नियम/कायदा

वनक्षेत्राचे संरक्षण प्रभावीपणे करणे याकरीता वनकर्मचाऱ्यांना शासनाने अधिकार प्रदान केलेले आहेत. कर्तव्ये पार पाडतांना वनकर्मचारी शासनाने वनविभागाकरीता निश्चति केलेल्या नियमांचा/कायद्यांचा वापर करतात.

१.भारतीय वन अधिनियम १९२७

२.मुंबई वनसंहिता १९४२

३.महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम १९६४

४. महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम १९६७

५.महाराष्ट्र अनुसुचित जमातींच्या मालकीतील वृक्षांची विक्री अधिनियम १९६९

६.महाराष्ट्र गौण वनोपज (नियमन) अधिनियम १९९७

७.वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२

८.महाराष्ट्र खाजगी वन संपादन अधिनियम १९७५

९.साइटीस १९७५

१०.वित्तिय अधिकार खंड १९७८

११.वन (संवर्धन) अधिनियम १९८०

१२.महाराष्ट्र नागरी सेवा नियम

## ६. विभागातील कागदपत्रांचा वर्गवारीचे विवरणपत्र

विभागातील कागदपत्रांची वर्गवारी कक्षवार करण्यात येवून प्रत्येक कक्षातील कागदपत्र वाटप केल्यानंतर त्या त्या कक्षाकडे ठेवण्यात येणाऱ्या कार्यविवरणात त्यांची नोंद घेण्यात येते. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांचे कार्यालयात १ ते ५ कक्ष आहेत व त्यानुसार कागदपत्रांचे वाटप करून कागदाचे अनुषंगिक संबंधित कक्षाकडून कार्यवाही करण्यात येते.

वरीलप्रमाणे ठाणे वनवृत्तांर्गत इतर ६ वन विभागामध्ये कक्ष पद्धती अवलंबिली जाते. कक्षवार कार्यविवरण ठेवून कागदपत्रांची वर्गवारी केली जाते.

## ७.धोरण तयार करण्याच्या किंवा अमंलबजावणी प्रक्रियेमध्ये जनतेच्या सहभागासाठी केलेली उपाययोजना

वनांचे संरक्षण करणे हे वन विभागाचे आद्य कर्तव्य आहे. त्याकरीता शासनाने नियम तयार केलेले आहेत व त्याची अंमलबजावणी करण्याकरीता आवश्यक तितके अधिकार संबंधित कर्मचाऱ्यांना दिलेले आहेत. तथापि शासनाच्या सुधारीत धोरणानुसार ग्रामस्थांना वनव्यवस्थापनामध्ये समाविष्ट केले जाते. त्याकरीता शासनाने शासन निर्णय दिनांक १६/०३/१९९२ व २५/०४/२००३ नुसार संयुक्त वन व्यवस्थापन ही संकल्पना अंमलात आणलेली आहे. संयुक्त वन व्यवस्थापन योजनेनुसार ग्रामस्थांना विश्वासात घेवून त्यांच्या मदतीने व सहकार्यातुन वनसंरक्षणाच्या व विकासाच्या योजना राबविण्यात येतात.

## ८.सल्ला देण्यासाठी स्थापन केलेली मंडळे/समित्या/परिषद याबाबतची माहिती

वन विभागाचे वनसंरक्षण हे मुख्य काम असल्याने जनतेचा सहभाग त्यामध्ये नाही. तथापि जन सामान्यामध्ये विश्वासार्हता निर्माण व्हावी व वनाविषयी आपुलकी वाटावी या उद्देशाने संयुक्त वन व्यवस्थापन, तेंदु पाने विक्री सल्लगार समिती इत्यादी स्थापन करण्यात आली आहेत.

## ९. अधिकारी व कर्मचारी यांची निर्देशिका

वनवृत्त स्तरावरून वन कर्मचाऱ्यांची संवर्गवार ज्येष्ठता यादी प्रकाशित करण्यात येते. स्द्यस्थितीत प्रकाशित करण्यात आलेल्या ज्येष्ठता यादीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्ग | वर्ष |
|---|---|---|
| १ | लेखापाल | ०१/०१/२०२३ |
| २ | लिपीक | ०१/०१/२०२३ |
| ३ | वनरक्षक | …………… |
| ४ | वाहनचालक | ०१/०१/२०२३ |
| ५ | शिपाई | ०१/०१/२०२३ |
| ६ | नाईक | ०१/०१/२०२३ |
| ७ | माळी | ०१/०१/२०२३ |
| ८ | रखवालदार | ०१/०१/२०२३ |

या वनवृत्तातील सहाय्यक वनसंरक्षक, वन परिक्षेत्र अधिकारी, क्षेत्र वनसर्व्हेक्षक, प्रशासकिय अधिकारी, कार्यालय अधिक्षक, मुख्य लेखापाल, वनसांख्यिक, सहाय्यक वनसांख्यिक, वरिष्ठ सांख्यिक, कनिष्ठ सांख्यिक सहाय्यक, लघुलेखक उच्चश्रेणी, लघुलेखक निम्नश्रेणी, लघुटंकलेखक, उप वन अभियंता, शाखा अभियंता, अनुरेखक व आरेखक या संवर्गाच्या ज्येष्ठता याद्या राज्यस्तरावर ठेवल्या जातात.

## १०.प्रत्येक कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन, नुकसान भरपाईची कार्यपद्धती

कर्मचाऱ्यांची वेतन देयके संगणकावर Online सेवार्थ प्रणालीमध्ये तयार करण्यात येवून उप कोषागार अधिकारी ठाणे यांचेकडून प्रमाणित करण्यात आल्यानंतर कोषागारामार्फत सदर रक्कम रोख व्यवस्थापन प्रणाली Cash Management Product (CMP) द्वारे बँकेत जमा करण्यात येते व बँकेकडून प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या वेतनाची रक्कम संबंधितांचे खात्यात जमा केली जाते.

या कार्यालयाकडील अधिकारी व कर्मचारी यांची ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | सुधारीत वेतन मॅट्रीक्स | वेतन स्तर |
|---|---|---|---|
| १ | विभागीय वन अधिकारी | ६७७००-२०२७०० | S-२३ |
| २ | सहाय्यक वनसंरक्षक | ४९१००-१५५८०० | S-१८ |
| ३ | प्रशासकिय अधिकारी | ६७७००-२०८७०० | S-२३ |
| ४ | वन परिक्षेत्र अधिकारी | ४१८००-१३२३०० | S-१५ |
| ५ | वनक्षेत्र सर्व्हेक्षक | ४१८००-१३२३०० | S-१५ |
| ६ | वनपाल | २५५००-८१००० | S-८ |
| ७ | कार्यालय अधिक्षक | ४१८००-१३२३०० | S-१५ |
| ८ | मुख्य लेखापाल | ३५४००-११२४०० | S-१३ |
| ९ | सहा.वनसांख्यिक | ४१८००-१३२३०० | S-१५ |
| १० | वरिष्ठ सांख्यिक | ३८६००-१२२८०० | S-१४ |
| ११ | कनिष्ठ सांख्यिक सहाय्यक | २५५००-८१००० | S-८ |
| १२ | लघुलेखक उच्चश्रेणी | ४१८००-१३२३०० | S-१५ |
| १३ | लघुलेखक निम्नश्रेणी | ३८६००-१२२८०० | S-१४ |
| १४ | लघुटंकलेखक | २५५००-८११०० | S-८ |
| १५ | उप वन अभियंता | ६७७००-२०२७०० | S-२३ |
| १६ | शाखा अभियंता | ४१८००-१३२३०० | S-१५ |
| १७ | अनुरेखक | ४१८००-१३२३०० | S-१५ |
| १८ | आरेखक | २१७००-६९१०० | S-७ |
| १९ | वनसर्व्हेक्षक | ३८६००-१२२८०० | S-१४ |
| २० | लेखापाल | २९२००-९२३०० | S-१० |
| २१ | लिपीक | १९९००-६३२०० | S-६ |
| २२ | नाईक | १६६००-५२२०० | S-३ |
| २३ | शिपाई | १५०००-४७६०० | S-१ |
| २४ | वाहनचालक | १९९००-६३२०० | S-६ |
| २५ | वनरक्षक | १८०००-५६९०० | S-५ |

नुकसान भरपाई प्रकरणी कर्मचाऱ्यांकडून प्राप्त होणारी वैद्यकिय देयके संबंधितांना वित्त विभाग कडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-१०१३/प्र.क्र.५३/कोष प्र-५, दि.०२/०३/२०१५ नुसार सदरची वैद्यकिय देयके ही महाकोष संकेतस्थळावरील बिल पोर्टल मधील प्रणालीद्वारे कोषागारामार्फत अदा केली जातात. उपरोक्त पद्धत ह्या विभागांतर्गत असणाऱ्या सर्व वनक्षेत्र कार्यालयामध्ये अवलंबिली जाते.

| अ.क्र. | अधिकारी /कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | वेतन |
|---|---|---|---|
| १ | श्री.एन.आर.प्रवीण | मुख्य वनसंरक्षक ठाणे | २७५२१० |
| २ | श्रीमती पी.एन.बर्गे | विभागीय वन अधिकारी नियोजन | १३१६९४ |
| ३ | श्री. आर.पी राठोड | विभागीय वन अधिकारी दक्षता | १०६९४१ |
| ४ | श्री. बी.एल.इनवाते | प्रशासकिय अधिकारी | १३७०९४ |
| ५ | श्री.आर.के.सांभारे | वन अभियंता | १४९२१४ |
| ६ | श्रीमती पी.के.नवले | वन सांख्यिक | १३१९७० |
| ७ | श्रीमती एन.एन.मानकर | वरिष्ठ सांख्यिक सहाय्यक | ११५३६२ |
| ८ | श्री. व्ही.व्ही.जाधव | लखुलेखक उच्च श्रेणी | ८४८६७ |
| ९ | श्री.सी.जे.चौधरी | मुख्य लेखापाल | १३३२९६ |
| १० | श्री.ए.ए.पाटील | मुख्य लेखापाल | १२७१४१ |
| ११ | श्री.एस.डी.मोरे | मुख्य लेखापाल | १०२७६६ |
| १२ | श्रीमती पी.एल.मोकाशी | कनिष्ठ सांख्यिक सहाय्यक | ८७३६३ |
| १३ | श्री.एस.एस.इंगवले | वनक्षेत्र सर्व्हेक्षक | १२५७९३ |
| १४ | श्री.जे.आर.भांगे | वन परिक्षेत्र अधिकारी | १०००९० |
| १५ | श्रीमती पी.पी.मिंडे | लेखापाल | ११०८१८ |
| १६ | श्री.एन.जी. शेळके | लेखापाल | ५०५५७ |
| १७ | श्री. नयना शिंपी | लेखापाल | ६८६९७ |
| १७ | श्रीमती आर.आर.शेट्ये | लेखापाल | ६००४३ |
| १८ | श्री.एस.सी.चौधरी | लेखापाल | ७४७३६ |
| १९ | श्री.जी.बी.संत | लेखापाल | ५६८३३ |
| २० | श्रीमती एस.एस.अडसूळ | लेखापाल | ६१२९३ |
| २१ | श्री.ए.ए.लाडकर | लेखापाल | ८३९१७ |
| २२ | श्री.व्ही.के.सांळुके | लेखापाल | ६०१२७ |
| २३ | श्री. एस.एस. गोदडे | लेखापाल | ६७४४७ |
| २४ | श्री.आर.पी.नारखेडे | लेखापाल | १०२६९० |
| २५ | श्रीमती चंदन भोये | लेखापाल | ९९८३८ |
| २६ | श्रीमती एस.पी.कदम | लेखापाल | ६८६९७ |
| २७ | श्रीमती के.एस.शेळके | लेखापाल | ५५७८० |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | श्रीमती के.एस.शेळके | लिपीक | ६४३८० |
| २९ | श्री. मोरश्वर गावंडा | लिपीक | ४३५७३ |
| ३० | श्री.वाय.जी.शेळके | लिपीक | ४२३२३ |
| ३१ | श्री.एन.आर.नन्नावरे | लिपीक | ५४४८० |
| ३२ | श्री. ए.जी.वाव्हळ | लिपीक | ३५४६४ |
| ३३ | श्री. पी.डी.जाधव | वनरक्षक | ४४२१२ |
| ३४ | श्री.पी.एस.साळवे | वनरक्षक | ४४२१२ |
| ३५ | श्री.पी.व्ही.खरात | वाहनचालक | ४५३०६ |
| ३६ | श्री.ई.एच.सांबरे | वाहनचालक | ६३६६६ |
| ३७ | श्री.बी.आर.जाधव | नाईक | ७०५९४ |
| ३८ | श्री.एस.डी.ससाणे | शिपाई | ५८३६४ |
| ३९ | श्री.आर.पी.पाटोळे | शिपाई | ४७७५० |

# ABSTRACT

| Minor Head | Sub-Head | Detailed Head | Division | Progressive Total | October-25 | November-25 | December-25 | Progressive Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| GRAND TOTAL OF 4406 CAPITAL OUTLAY ON | | NTSP | Thane | 11,52,145 | 91,46,285 | 8,40,695 | 2,12,36,200 | 3,23,75,325 |
| | | | Dahanu | - | 1,48,120 | - | 2,54,65,025 | 2,56,13,145 |
| | | | Shahapur | 8,44,492 | 4,08,91,320 | 11,24,79,169 | 18,55,81,756 | 33,97,96,737 |
| | | | Jawhar | 20,87,692 | 79,16,984 | 59,31,118 | 28,35,202 | 1,87,70,996 |
| | | | Alibag | 51,64,909 | 18,18,405 | 49,65,288 | 6,46,46,050 | 7,65,94,652 |
| | | | Roha | 12,33,018 | 4,25,295 | 26,774 | 6,23,911 | 23,08,998 |
| | | | CCF Thane | - | - | 2,00,000 | 1,35,970 | 3,35,970 |
| | | Grant Total | | 1,04,82,256 | 6,03,46,409 | 12,44,43,044 | 30,05,24,114 | 49,57,95,823 |
| Total 2406 Forestry and Wildlife Non TSP | | TSP | Thane | 24,80,270 | - | - | 21,87,000 | 46,67,270 |
| | | | Dahanu | - | - | - | - | - |
| | | | Shahapur | - | 1,48,75,000 | - | - | 1,48,75,000 |
| | | | Jawhar | 2,22,180 | 44,436 | 15,96,936 | - | 18,63,552 |
| | | | Alibag | - | - | - | - | - |
| | | | Roha | - | - | - | - | - |
| | | | CCF Thane | - | - | - | - | - |
| | | | G. Total | 27,02,450 | 1,49,19,436 | 15,96,936 | 21,87,000 | 2,14,05,822 |
| FORESTRY AND WILDLIFE TSP FORESTRY AND WILDLIFE NON TRIBAL SUB-PLAN | | NTSP | Thane | 7,45,025 | 5,00,000 | - | 4,28,11,937 | 4,40,56,962 |
| | | | Dahanu | 6,83,724 | - | - | 25,04,466 | 31,88,190 |
| | | | Shahapur | 16,772 | 6,59,45,536 | 2,14,87,291 | 8,01,71,572 | 16,76,21,171 |
| | | | Jawhar | 4,69,172 | - | 7,57,066 | 57,97,800 | 70,24,038 |
| | | | Alibag | 1,84,83,611 | 1,14,42,150 | 6,38,121 | 62,13,427 | 3,67,77,309 |
| | | | Roha | - | 21,94,000 | 8,45,857 | 1,01,72,314 | 1,32,12,171 |
| | | | Total | 2,03,98,304 | 8,00,81,686 | 2,37,28,335 | 14,76,71,516 | 27,18,79,841 |
| Capital Outlay on Forestry 4406 Tribal Sub-Plan | | TSP | Thane | - | - | - | - | - |
| | | | Dahanu | - | 2,79,61,817 | 76,07,219 | 1,77,01,922 | 5,32,70,958 |
| | | | Shahapur | 49,74,751 | - | - | 59,04,000 | 1,08,78,751 |
| | | | Jawhar | 11,84,960 | 26,51,079 | - | - | 38,36,039 |
| | | | Alibag | - | - | - | - | - |
| | | | Roha | - | - | - | - | - |
| | | | Total | 61,59,711 | 3,06,12,896 | 76,07,219 | 2,36,05,922 | 6,79,85,748 |
| GRAND TOTAL | | | Thane | 43,77,440 | 96,46,285 | 8,40,695 | 6,62,35,137 | 8,10,99,557 |
| | | | Dahanu | 6,83,724 | 2,81,09,937 | 76,07,219 | 4,56,71,413 | 8,20,72,293 |
| | | | Shahapur | 58,36,015 | 12,17,11,856 | 13,39,66,460 | 27,16,57,328 | 53,31,71,659 |
| | | | Jawhar | 39,64,004 | 1,06,12,499 | 82,85,120 | 86,33,002 | 3,14,94,625 |
| | | | Alibag | 2,36,48,520 | 1,32,60,555 | 56,03,409 | 7,08,59,477 | 11,33,71,961 |
| | | | Roha | 12,33,018 | 26,19,295 | 8,72,631 | 1,07,96,225 | 1,55,21,169 |
| | | | CCF Thane | - | - | 2,00,000 | 1,35,970 | 3,35,970 |
| | | | Total | 3,97,42,721 | 18,59,60,427 | 15,73,75,534 | 47,39,88,552 | 85,70,67,234 |

## **१२.सबसिडीचे कार्यक्रम, पद्धत, रकमा, लाभार्थीबाबतची माहिती**

या कार्यालयामार्फत वैयक्तिक लाभार्थी योजना राबविण्यात येत नसल्याने सदरची माहिती निरंक आहे.

**<u>१३.सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रांबाबतची माहिती</u>**

या कार्यालयामार्फत सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्र देण्यात येत नसल्याने सदरची माहिती निरंक आहे.

## १४.इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध असलेली माहिती

ठाणे वनवृत्तात खालील माहिती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध आहे.

१. वन विभागात काम करणाऱ्या सर्व कर्मचारी व अधिकारी यांच्या ज्येष्ठता याद्या.
२. ठाणे वृत्ताचा लेखा सारांश.
३. ठाणे वनवृत्तात नियुक्त केलेले जन माहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी यांची नावे व पदनाम यांची यादी.
४. मासिक तथा त्रैमासिक अहवाल.
५. वनवृत्तात काम करणाऱ्या सर्व कर्मचारी व अधिकारी यांचा तपशिल.
६. विधानसभा व विधानपरिषद प्रश्नांशी संबंधित पुरविण्यात आलेली माहिती.

## १५.लायब्ररीसह नागरिकांना माहिती मिळणेसाठी दिलेल्या सुविधा

या कार्यालयाकडून कोणत्याही नागरिकांस त्यांनी समक्ष अथवा लेखी माहिती मागणी केलेली माहिती संबंधितांना उपलब्ध करून देण्यांत येते.

## १६.ठाणे वनवृत्तातील माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची नावे व पदनाम

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व पदनाम सर्वश्री | अपिलीय अधिकाराऱ्याचे नाव व पदनाम सर्वश्री |
|---|---|---|---|
| १ | मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांचे कार्यालय, बारा बंगला एरिया, कोपरी ठाणे (पुर्व)-४००६०३ | श्री. जगदीश रा.भांगे, वन परिक्षेत्र अधिकारी (जं.का.स.सं.) ठाणे, वनवृत्त ठाणे | श्रीमती प्रियांका बर्गे, विभागीय वन अधिकारी नियोजन ठाणे |
| २ | उप वनसंरक्षक ठाणे यांचे कार्यालय, एल.बी.एस.मार्ग, तीन हसत नाका, नौपाडा, ठाणे (पश्चिम) दुरध्वनी क्र.०२२-२५४४३४३४९ | श्री.विशाल गोदडे, वन परिक्षेत्र अधिकारी वन्यजीव घटक ठाणे, उप वनसंरक्षक ठाणे यांचे कार्यालय, | श्रीमती सोनल वळवी, सहा.वनसंरक्षक (र.रा.प.) ठाणे, उप वनसंरक्षक ठाणे यांचे कार्यालय, |
| ३ | उप वनसंरक्षक डहाणू यांचे कार्यालय, पारनाका, पंचायत समितीच्या बाजूला, मु.पो.डहाणू,जि.पालघर दूरध्वनी क्र. ९९६००७३२५८ | श्रीमती प्रीती बेलकर, लेखापाल, उप वनसंरक्षक डहाणू यांचे कार्यालय | श्री.संजय गायकवाड, मुख्य लेखापाल, उप वनसंरक्षक डहाणू यांचे कार्यालय |
| ४ | उप वनसंरक्षक शहापुर यांचे कार्यालय, जुना आग्रा रोड, वनरक्षक प्रशिक्षण विद्यालय, शहापुर जवळ, मु.पो.ता. शहापुर, जि.ठाणे ४२१६०२१ दुरध्वनी क्र.२७२०९६ | श्री.अजयकुमार सांगळे, मुख्य लेखपाल, उप वनसंरक्षक शहापुर यांचे कार्यालय, | श्रीमती अक्षता पाटील, कार्यालय अधिक्षक, उप वनसंरक्षक शहापुर यांचे कार्यालय, |
| ५ | उप वनसंरक्षक जव्हार यांचे कार्यालय, प्रांत ऑफिस जवळ, मु.पो.ता.जव्हार, जि.पालघर ४०१६०३ दुरध्वनी क्र.९७६५८७०७०२ | श्री.किलोडा, कार्यालय अधिक्षक, उप वनसंरक्षक जव्हार यांचे कार्यालय | डॉ.सैपुन शेख, उप वनसंरक्षक जव्हार |
| ६ | उप वनसंरक्षक अलिबाग यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय अलिबागच्या मागे, अलिबाग, जि.रायगड | श्री.नितीन वाणी, मुख्य लेखापाल, उप वनसंरक्षक अलिबाग यांचे कार्यालय | श्री. भाऊसाहेब जवरे, सहा. वनसंरक्षक अलिबाग, उप वनसंरक्षक अलिबाग यांचे कार्यालय |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४०२२०१ दुरध्वनी क्र.०२१४१-२२२०१६ | | |
| ७ | उप वनसंरक्षक रोहा यांचे कार्यालय, सेवादल आळी, मु.पो.ता.रोहा जि.रायगड ४०२१०९ दुरध्वनी क्र.०२१९४-२३५७५५ | श्री. जनार्दन दोरे, कार्यालय अधिक्षक, उप वनसंरक्षक रोहा यांचे कार्यालय | श्री.संजय पांढरकामे , सहाय्यक वनसंरक्षक जंकाससं व कॅम्पा रोहा |

## १७.इतर माहिती

वन्यप्राणी हल्ले प्रकरणाची माहिती/महसुलाबाबत माहिती/न्यायालयीन प्रकरणे/अवैध वृक्षतोड/वनगुन्हे प्रकरणे/जप्त वाहने/वनवणवा/वनजमिनीवरील अतिक्रमाणे/तेंदू उत्पादन व प्राप्त महसुल याबाबतची माहिती www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.